Subscribe इयत्ता – पाचवी (21 जुलै) माझा अभ्यास Subscribe

शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

दिवस एकवीस :

गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

टेस्ट सोडवा

४. सावरपाडा एक्स्प्रेस : कविता राऊत

सराव

प्र. ६. तुम्हांला वैयक्तिक खेळातील कोणता खेळ अधिक आवडतो? तो का आवडतो?

प्र. ७. तुम्हांला मैदानी खेळ आवडतात, की बैठे खेळ? की दोन्ही? ते खेळ का आवडतात ते थोडक्यात लिहा.

प्र. ८. खालील वाक्यांतील अधोरेखित केलेल्या शब्दसमूहांचे नेमके अर्थ काय होतात ते तुमच्या शब्दांत सांगा.

(अ) तुमची गल्ली/गाव कशाने वेढलेले आहे?

(आ) आपल्या राज्यातली अनेक शहरे धुराने वेढलेली आहेत.

(इ) अनेक मोठी शहरे सिमेंटच्या जंगलांनी वेढलेली आहेत.

(ई) कार्यालयात अनिताबाई नेहमी फायलींनी वेढलेल्या असतात.

प्र. ९. शरीर या शब्दापासून 'शारीरिक' हा शब्द तयार झाला आहे. खालील शब्द वाचा व समजून घ्या.

उद्योग- औद्योगिक, शिक्षण- शैक्षणिक, बुद्धी- बौद्धिक, नीती- नैतिक, संस्कृती- सांस्कृतिक, भूगोल- भौगोलिक, इतिहास- ऐतिहासिक, विज्ञान- वैज्ञानिक.

प्र. १०. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'क्रीडामहोत्सव' या विषयावर आठ ते दहा वाक्ये लिहा.

महोत्सवाचा दिवस, महिना, काळ, स्थळ, तालुका/जिल्हा/राज्य पातळी, खेळांचे प्रकार, सर्वांत जास्त आवडलेला खेळ, आवडण्याची कारणे, स्पर्धा कशा पार पडल्या, बक्षीस वितरण समारंभ पाहताना मनात आलेले विचार.

उपक्रम : १. तुम्हांला माहीत असलेल्या धावपटूंची नावे लिहा. त्यांनी जिंकलेल्या स्पर्धा व पदके यांची माहिती घ्या. त्यांची चित्रे जमवा.

२. खालील प्रकारे सारणी तयार करून वहीत जास्तीत जास्त नावे लिहा.

बैठे खेळ	मैदानी खेळ

३. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा व ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा यांची खालील मुद्द्यांच्या आधारे शिक्षकांकडून माहिती मिळवा. मिळवलेल्या माहितीवर मित्रांशी चर्चा करा.

(अ) स्पर्धा भरवण्याचा कालावधी.

(आ) समाविष्ट क्रीडा प्रकार.

(इ) विजेत्या खेळाडूस किंवा संघास दिली जाणारी पारितोषिके.

४. या स्पर्धांमधील काही खेळाडूंची चित्रे, वर्तमानपत्रांतील स्पर्धांसंदर्भातील बातम्या, कात्रणे, खेळांची क्षणचित्रे मिळवून त्यांचा संग्रह तयार करा.

५. वाचा. चर्चा करा. माहिती मिळवा.

पाण्यासाठी वणवण भटकावे लागणे ही चांगली बाब नाही. ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. मित्र, शिक्षक, कुटुंबातील व्यक्ती, गावातील लोक यांच्याशी पुढील मुद्द्यांवर चर्चा करा.

(अ) तुमच्या गावातील पाण्याच्या साठ्यांचे प्रकार.

(आ) तुमच्या गावात पाणीटंचाई असल्यास त्याची कारणे. पाणीटंचाई नसल्यास त्याची कारणे.

(इ) कविता राऊतप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन घडलेल्या एखाद्या व्यक्तीविषयी माहिती मिळवा व लिहा.

खालील बेरीज करा.

3. बेरीज व वजाबाकी

टेस्ट सोडवा

उदाहरणसंग्रह 8

बेरीज करा.

(1) 42,311 + 65,36,624
(2) 3,17,529 + 8,04,613
(3) 12,42,746 + 4,83,748
(4) 24,12,636 + 23,19,058
(5) 2,654 + 71,209 + 5,03,789
(6) 29 + 726 + 51,36,274
(7) 14,02,649 + 524 + 28,13,749
(8) 23,45,678 + 9,87,654
(9) 22 + 6,047 + 3,84,527
(10) 2,345 + 65,432 + 76,54,369

पुढील शाब्दिक उदाहरण अभ्यासा.

✦ पोलिओ निर्मूलनाच्या अभियानामध्ये 2012 साली एका जिल्ह्यात 3,17,658 बालकांना व दुसऱ्या जिल्ह्यात 2,04,969 बालकांना पोलिओ डोस देण्यात आले, तर एकूण किती बालकांना पोलिओ डोस देण्यात आले ?

$$\begin{array}{r} 3\,1\,7\,6\,5\,8 \\ +\ 2\,0\,4\,9\,6\,9 \\ \hline 5\,2\,2\,6\,2\,7 \\ \hline \end{array}$$

एकूण 5,22,627 बालकांना पोलिओ डोस देण्यात आले.

उदाहरणसंग्रह 9

खालील उदाहरणे सोडवा.

1. एका निवडणुकीत 13,47,048 स्त्रियांनी व 14,29,638 पुरुषांनी मतदान केले, तर एकूण मतदान किती झाले ?
2. सहा अंकी सर्वांत मोठी संख्या व सहा अंकी सर्वांत लहान संख्या यांची बेरीज किती येईल ?
3. सुरेखाताईंनी 8,07,957 रुपयांचा ट्रॅक्टर व 32,609 रुपयांचे मळणीयंत्र खरेदी केले, तर त्यांनी एकूण किती रुपये खर्च केले ?
4. एका गिरणीत मागील वर्षी 17,24,938 मीटर कापड तयार झाले. यावर्षी 23,47,056 मीटर कापड तयार झाले, तर दोन्ही वर्षांत मिळून किती कापड तयार झाले ?
5. राज्यशासनाने शाळांना 34,62,940 रुपयांचे संगणक व 3,26,578 रुपयांचे दूरदर्शनसंच दिले, तर शासनाने एकूण किती रुपयांचे साहित्य दिले ?

❐ वजाबाकी – उजळणी

पुढील उदाहरण अभ्यासा.

एका परीक्षेला मागील वर्षी 38,796 विद्यार्थी बसले. यावर्षी 47,528 विद्यार्थी बसले, तर यावर्षी परीक्षेला किती जास्त विद्यार्थी बसले ?

$$\begin{array}{r} 4\,7\,5\,2\,8 \\ -\ 3\,8\,7\,9\,6 \\ \hline 0\,8\,7\,3\,2 \\ \hline \end{array}$$

यावर्षी परीक्षेला 8,732 विद्यार्थी जास्त बसले.

येथे हातचे मनात धरून वजाबाकी केली आहे.

Add.

Problem Set 8

Add :

(1) 42,311 + 65,36,624
(2) 3,17,529 + 8,04,613
(3) 12,42,746 + 4,83,748
(4) 24,12,636 + 23,19,058
(5) 2,654 + 71,209 + 5,03,789
(6) 29 + 726 + 51,36,274
(7) 14,02,649 + 524 + 28,13,749
(8) 23,45,678 + 9,87,654
(9) 22 + 6,047 + 3,84,527
(10) 2,345 + 65,432 + 76,54,369

Study the following word problem.

✦ During the polio eradication campaign, 3,17,658 children were given the polio vaccine in one District and 2,04,969 children in another. Altogether, how many children got the vaccine ?

$$\begin{array}{r} 3\,1\,7\,6\,5\,8 \\ +\ 2\,0\,4\,9\,6\,9 \\ \hline 5\,2\,2\,6\,2\,7 \\ \hline \end{array}$$

Altogether, 5,22,627 children got the vaccine.

Problem Set 9

Solve the following problems.

1. In a certain election, 13,47,048 women and 14,29,638 men cast their votes. How many votes were polled altogether ?
2. What will be the sum of the smallest and the largest six-digit numbers ?
3. If Surekhatai bought a tractor for ₹ 8,07,957 and a thresher for ₹ 32,609, how much money did she spend altogether ?
4. A textile mill produced 17,24,938 metres of cloth last year and 23,47,056 metres this year. What was the total production for the two years ?
5. If the Government gave ₹ 34,62,950 worth of computers and ₹ 3,26,578 worth of TV sets to the schools, what is the total amount it spent on this equipment ?

❒ Subtraction : Revision

Study the following example.

✦ Last year , 38,796 students took a certain exam. This year the number was 47,528. How many more students took the exam this year ?

$$\begin{array}{r} 4\,7\,5\,2\,8 \\ -\ 3\,8\,7\,9\,6 \\ \hline 0\,8\,7\,3\,2 \\ \hline \end{array}$$

8,732 more students took the exam this year.

अर्थपूर्ण वाक्य तयार करा. **Revision**

टेस्ट सोडवा

- Learn, practise and play this game. शिका, सराव करा आणि हा खेळ खेळा. 03

(a) Complete the sentences in each box to make meaningful questions. अर्थपूर्ण प्रश्न तयार होतील अशा प्रकारे प्रत्येक चौकटीतील वाक्ये पूर्ण करा. W9

- Am I (green)?
- Are we ....?
- Are you ....?
- Is she ....?
- Is he ....?
- Is it ....?
- Are they ....?

- Have I got (wheels)?
- Have we got ....?
- Have you got ....?
- Has she got ....?
- Has he got ....?
- Has it got ....?
- Have they got ....?

- Do I (eat mice)?
- Do we ....?
- Do you ....?
- Does she ....?
- Does he ....?
- Does it ....?
- Do they ....?

(b) Read aloud the words in each set. प्रत्येक संचातील शब्द मोठ्याने वाचा. 04

birds • parrot • crow • sparrow • owl • duck • crane

animals • squirrel • mouse • elephant • lion • cat • dog

vehicles • bus • motorcar • auto-rickshaw • motorbike • aeroplane • bicycle

toys • ball • balloon • top • doll • kite • tricycle

(c) Now, make groups of five, including a leader. The leader assigns roles to others from any one set. They guess who they are using suitable 'yes/no' questions. Direct questions like 'Am I a parrot?' are not allowed.

आधी प्रात्यक्षिक देऊन नंतर ५-५ जणांच्या गटांत हा खेळ घ्यावा.

गटप्रमुखाने मनातल्या मनात एक संच निवडून गटातील प्रत्येकाला (स्वतःसह) त्यातील एक नाव द्यावे. इतरांना न दाखवता ही नावे लिहून ठेवावी. नंतर बाकीच्यांनी (a) मधील नमुन्यांत प्रश्न विचारून प्रत्येकाचे नाव शोधून काढावे. नंतरही अधूनमधून हा खेळ घ्यावा.

पाठ वाचा व समजून घ्या.

३. पृथ्वी आणि जीवसृष्टी

टेस्ट सोडवा

वातावरण

पृथ्वीभोवती असणाऱ्या हवेच्या आवरणाला वातावरण म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून आपण जसजसे उंच जातो, तसतशी वातावरणातील हवा विरळ होत जाते. हवेचे मुख्यत्वे नायट्रोजन, ऑक्सिजन, बाष्प, कार्बन डायऑक्साइड हे घटक आहेत. याशिवाय इतरही काही वायू अत्यंत कमी प्रमाणात हवेमध्ये आहेत, हे तुम्ही शिकला आहात.

पृथ्वीच्या पृष्ठभागापासून वातावरणाचे तपांबर, स्थितांबर, मध्यांबर, आयनांबर व बाह्यांबर असे विविध थर मानतात. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून सरासरी १३ किलोमीटर अंतरापर्यंतच्या थराला **तपांबर** म्हणतात. तपांबरातील हवेत अनेक बदल होत असतात. या बदलांचे पृथ्वीवरील सजीवांच्या जीवनावर महत्त्वाचे परिणाम होतात.

सूर्यापासून पृथ्वीला उष्णता मिळाल्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग तापतो, म्हणून पृष्ठभागालगतची हवा सर्वाधिक गरम असते. तपांबरात वरवर गेले असता हवा थंड होत जाते. वातावरणातील जवळजवळ सर्व बाष्प तपांबरातच असते, म्हणून ढग, पाऊस (पर्जन्य), धुके, वारे, वादळे अशा हवामानाशी संबंध असलेल्या सर्व घटना तपांबरातच होतात. उंच डोंगरावर गेले असता सभोवतालची हवा पृष्ठभागाच्या हवेपेक्षा विरळ असते. वाहतुकीसाठी वापरली जाणारी सर्व विमाने तपांबराच्या उंचावरच्या भागात उडतात. त्या उंचीवर हवा आणखी विरळ असते. विमाने उंच गेल्यावर प्रवाशांना श्वसनासाठी पुरेशी हवा मिळावी, म्हणून विमानात विशेष सोय करावी लागते.

पृथ्वीतलापासून तपांबराच्या बाहेर सुमारे ५० किलोमीटरपर्यंतच्या थराला स्थितांबर म्हणतात. स्थितांबरात खालच्या भागात ओझोन वायूचा थर आढळतो. सूर्यापासून येणारी अतिनील किरणे सजीवांसाठी हानिकारक असतात. ओझोन वायू ही किरणे शोषून घेतो, त्यामुळे पृथ्वीवरील सजीवांचे रक्षण होते.



पृथ्वीचे वातावरण

जरा डोके चालवा.

(१) सप्तरंगी इंद्रधनुष्य वातावरणाच्या कोणत्या आवरणात दिसत असेल?

(२) गिर्यारोहक उंच पर्वतांवर चढून जातात. ज्या पर्वतांची उंची ५,००० मीटरपेक्षा जास्त असते, असे पर्वत चढताना बहुतांश गिर्यारोहक ऑक्सिजनचे सिलिंडर घेऊन जातात. त्याचे कारण काय असेल?

नवीन शब्द शिका

संघनन – बाष्प थंड होऊन त्याचे द्रवात रूपांतर होण्याची क्रिया.

२. इतिहास आणि कालसंकल्पना

टेस्ट सोडवा

पाठ वाचा व समजून घ्या.

आज १० तारीख असेल, तर काल ९ तारीख होती आणि उद्या ११ तारीख असेल हे सांगता येते. म्हणजे कालगणनेच्या पद्धतींमध्ये आपण काळाची लांबी मोजतो.

इसवी सनाचा प्रारंभ होण्यापूर्वीच्या काळात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास करताना त्यांच्या काळाचा उल्लेख इसवी सनापूर्वी अमुक इतकी वर्षे असा केला जातो. त्यांपैकी काही घटनांची माहिती आपल्याला जमिनीखाली गाडल्या गेलेल्या पुराव्यांच्या आधाराने मिळवावी लागते. तो पुरावा बहुधा वस्तू आणि वास्तू यांच्या अवशेषांच्या स्वरूपात असतो. त्या अवशेषांच्या आधाराने हजारो वर्षांपूर्वीच्या घटनांची कालनिश्चिती करणे वैज्ञानिक पद्धतींच्या आधारे शक्य होते.

जमिनीखाली मातीचे एकावर एक असे अनेक थर साचलेले असतात. मातीच्या थरांचा आणि त्या थरांत मिळालेल्या अवशेषांचा कालखंड अमुक तारखेपासून अमुक तारखेपर्यंत असा निश्चित स्वरूपात सांगता येत नाही. 'आजपासून अमुक इतक्या वर्षांपूर्वी' अशा पद्धतीने त्या काळाची मोजणी करणे मात्र शक्य असते. म्हणून अशा पद्धतींना 'कालमापनाच्या पद्धती' असे म्हटले जाते. अशा प्रकारे कालमापन करण्यासाठी कर्ब १४ विश्लेषण, काष्ठवलयांचे विश्लेषण यांसारख्या विविध वैज्ञानिक पद्धतींचा उपयोग केला जातो. कालमापनाच्या आधाराने अवशेष आणि ज्या थरांत ते सापडले ते मातीचे थर किती वर्षांपूर्वीचे आहेत हे समजले, की त्यांचा काळ ढोबळमानाने निश्चित करता येतो. उदा. एखादे मातीचे भांडे पाच हजार वर्षांपूर्वीचे आहे असा निष्कर्ष कालमापन पद्धतींच्या आधारे निघाला, तर असे म्हणता येते, की त्या भांड्याचा काळ इ.स.पू.सुमारे तीन हजार वर्षे इतका आहे. त्याच्या आधारे ज्या संस्कृतीशी ते भांडे निगडित आहे, त्या संस्कृतीचा काळ इ.स.पू. सुमारे तीन हजार वर्षे इतका आहे, असे सांगता येते.

स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) आपण वापरतो ती दिनदर्शिका ----- वर आधारलेली असते.

(आ) इसवी सनाची सुरुवात होण्यापूर्वीच्या काळाला -------- असे म्हटले जाते.

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कालमापन करण्यासाठी कोणत्या वैज्ञानिक पद्धतींचा वापर केला जातो ?

(आ) इसवी सनाच्या पहिल्या शंभर वर्षांचा काळ कसा लिहिला जातो ?

३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) काळाची एकरेखिक विभागणी म्हणजे काय ?

(आ) कालगणना करण्याची एकके कोणती ?

४. पुढील तक्ता पूर्ण करा.



टेस्ट सोडवा

● देखो और सुनो :











पढ़ो : यह, नख, उर, आम, गठन, शपथ, ऊपर, चमचम, हमदम, चकमक, चटपट, फड़ककर, आई, माई, इरा, रमा, ढाका, मामा, शाला, चाचा, आकाश, कपड़ा, दादरा, अचार, इकहरा, चारपाई, दीदी, चूरा, कुहू, चिड़िया, शिकारी, दीपिका, जामुन, नूपुर, दुरूह, कुरूप, गुटरू, शारीरिक, पिचकारी ।

माझा ऑनलाईन अभ्यास

स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

पाचवी मराठी	पाचवी गणित	सेमी गणित	पाचवी इंग्रजी	पाचवी प.अ-1	पाचवी प.अ-2	हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
		आठवी	नववी	दहावी		

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in